**<u>१९४७ मध्ये ज्यांचेमुळे लडाख वाचले ते शुर सैनिक</u>**

*येथील जमीन नापीक असून खिंडी एवढ्या उंच आहेत की केवळ उत्तम मित्र किंवा भयंकर शत्रूच इथे येऊ इच्छितील - एक लडाखी म्हण.*

**<u>लेफ्टनंट कर्नल शेर जंग थापा ह्यांची सहा महिने लढाई</u>**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिशांचे सार्वभौमत्व संपुष्टात आल्याने, हा प्रदेश तांत्रिकदृष्ट्या आणि कायदेशीरपणे ३० जून १९४७ रोजी जम्मू आणि काश्मीरमध्ये दाखल झाला.

ब्रिटिश पॉलिटिकल एजंटाने, जम्मू आणि काश्मीरच्या महाराजांनी नियुक्त केलेल्या गिलगिटच्या गव्हर्नरांच्या हाती ३० जून १९४७ रोजी, हा प्रदेश सुपूर्त केला. ह्या अधिकार्यांनी ३१ ऑक्टोंबर १९४७ रोजी कट करून, गव्हर्नरांना कैदेत टाकले. मेजर ब्राऊन ह्यांनी ०३ नोव्हेंबर १९४७ रोजी पाकिस्तानी झेंडा फडकावला आणि प्रशासन पाकिस्तानचे हाती सुपूर्त केले आणि आदिवासींशी  संगनमत करून, राज्यातील इतर भागांवर पाकिस्तानने ताबा मिळवला. पाकिस्तान समर्थित आदिवासी शायॉक आणि सिंधू खोर्यांपर्यंत पुढे आले. त्यांचे उद्‌दिष्ट लेह आणि अंतीमतः संपूर्ण लडाखवर कब्जा करण्याचे होते. लेफ्टनंट कर्नल शेर जंग थापा ह्यांच्या नेतृत्वाखालील, राज्याच्या सैन्यातील, स्कार्डूच्या पथकाने सहा महिने किल्ला लढवला. लेहपर्यंतची पाकिस्तानची प्रगती प्रलंबित करण्यात ह्यामुळे मोलाची मदत झाली.

**<u>मेजर पृथ्वीचंद,कॅप्टन खुशालचंद जोझिला मार्गे पायी आले</u>**

लेहला सैन्याच्या ३३ माणसांच्या एका प्लॅटूनचे संरक्षण होते.

त्यास कुमक देण्याची इतर कोणतीच शक्यता नसल्याने, मेजर पृथ्वीचंद आणि कॅप्टन खुशालचंद २ डोग्रा आणि राज्याच्या सैन्याच्या २ प्लॅटून्स ह्यांना घेऊन १६ फेब्रुवारी १९४८ रोजी श्रीनगरहून जोझिला मार्गे पायीच रवाना झाले. हिवाळ्यात ते प्रथमच असे करत होते. ब्रिटिशांकरवी प्रशिक्षित लडाखचे पहिले अभियंत्रज्ञ सोनम नोर्बू हेही त्यांचेसोबत होते. लेह येथे धावपट्टी तयार करण्यासाठी त्यांचेपाशी रु.१३,०००/- दिलेले होते. ८ मार्च १९४८ रोजी ते लेहला जाऊन पोहोचले.

**<u>कर्नल चेवांग रिंचेन, महावीरचक्र अँड बार</u>**

मेजर पृथ्वीचंद ह्यांनी ७-जे.अँड.के. लष्कर उभारण्यास सुरूवात केली. त्यात चेवांग रिंचेन नावाचा एक तरूण होता. पुढे जाऊन तो कर्नल चेवांग रिंचेन, महावीरचक्र अँड बार, सेना मेडल झाला.

सिंधू खोर्‍याचा तळ आणि शहर ह्यांच्या दरम्यान धावपट्टी बांधण्याचे काम १२ मार्च १९४८ रोजी सुरू झाले. ६ एप्रिल १९४८ रोजी अत्यंत परिश्रमपूर्वक २,३०० यार्डांची धावपट्टी बांधून तयार झालेली होती. कोणत्याही मापाने हे काम अत्यंत महत्वाचे होते. नोर्बू ह्यांनी रु.१०,८९१/- खर्चले होते. उर्वरित रु.२,१०९/- त्यांनी सरकारी खजिन्यात जमा केले. ६ एप्रिल १९४८ रोजी त्यांनी विमाने आणि कुमक आता लगेचच पाठवू शकता, अशी विनंती करणारा एक बिनतारी संदेश पाठवला.

२२ मे १९४८ पर्यंत सिंधू खोर्‍यातील लेहच्या बाहेरील भागातील जोझिला, कारगील, खाल्तसी आणि थारू ह्यावर पाकिस्तानी आक्रमकांनी ताबा मिळवलेला होता. श्रीनगरपासूनचा खुष्कीचा मार्ग आता उपलब्ध नव्हता. शत्रू लेहच्या दरवाजावर उभा होता. कुमक पुरवण्याचा इतर कोणताही उपाय उपलब्ध नव्हता. लेह आता केवळ हवाई मार्गानेच वाचवता येणार होते.

**<u>पहिल्या विमानासोबत स्वतः जनरल थिमय्या</u>**

मेजर जनरल थिमय्या ह्यांनी एअर कमोडोर मेहरसिंग, आदेशक, वायूदल, जे.अँड.के. ह्यांना मे महिन्याच्या तिसर्या आठवड्यात पाचारण केले. लेहला वाचवण्याकरता वायूदलाची मदत करण्याची विनंती केली. मेहरसिंग ह्यांनी स्पष्ट केले की, डाकोटा मालवाहू विमाने इतक्या उंचीवर चालवण्याकरता सक्षम नाहीत. या विमानात एयर प्रेशर कायम ठेवण्याकरता प्राणवायू नेण्याची सोयही नाही. विमानाची १८,००० फूटाहून अधिक उंचीवर उडण्याची क्षमताही मर्यादितच आहे. मार्गावरील हवामानाची माहिती नाही आणि तिचे भाकीतही केले जाऊ शकत नाही. त्यावेळी वायूदलाकडे मालवाहू डाकोटा विमानाचे केवळ एकच स्क्वाड्रोन होते. ते काश्मीर आणि पूँछ भागातील इतर मार्गावरही वापरले जातच होते. त्यावर थिमय्या ह्यांनी पहिल्या विमानासोबत स्वतः जाण्याची आणि वायूदलासोबत धोका पत्करण्याची तयारी दर्शवली. त्यावर मेहरसिंग तयार झाले. एवढेच नव्हे, तर त्यांनी स्वतःच पहिले विमान लेहला नेण्याचा निर्णय घेतला. हा त्या दोघांमधला करार होता. त्यास मुख्यालयाकडून कोणत्याही प्रकारची अनुमती प्राप्त झालेली नव्हती.या दोनी सेनापतींचे त्यांनी घेतलेल्या धोक्यांकरता कौतुक केले पाहिजे.

## <u>वायूमार्गे प्रवासाचा एक इतिहास रचला</u>

लेहची धावपट्टी ११,००० फुटांवर आहे. त्या वेळेपर्यंत कुणीही मालवाहू विमान अशा उंचीवर उतरवलेले नव्हते. धावपट्टी एका डोंगराच्या मधे तयार केली होती. थोडक्यात काय तर पहिल्याच प्रयत्नात विमान नीट उतरले पाहिजे होते. प्राणवायूचे उपकरणे नव्हते. नकाशे नव्हते. दिग्दर्शन सुविधांची(navigation) सोय नव्हती. धावपट्टीबाबतचा पूर्वानुभव नव्हता.

मेहरसिंग ह्यांनी २४ मे १९४८ रोजी उड्डाण भरले. विमानात त्यांचेसोबत फ्लाईट लेफ्टनंट एस.डी.सिंग आणि जनरल थिमय्या होते. प्रथम १८,००० फूट उंचीवर जाणे

आणि नंतर जोझि-ला, नामिक-ला आणि फोटू-ला ह्या खिंडी पार करत ते लेहला उतरले. वायूमार्गे प्रवासाचा एक इतिहासच घडत होता.

नंतर १ जून रोजी एअर कमोडोर मेहरसिंग हे सहा डाकोटा विमानांचे एक पथकच घेऊन गेले. त्यात २/४ गुरखा रायफल्सची एक कंपनी होती. आवश्यक सामान आणि दारुगोळाही होता. धावपट्टीनजीकच हे सर्व सामान खाली टाकूनच, एअर कमोडोर मेहरसिंग ह्यांनी धावपट्टीवर पहिले विमान उतरवले. इतर विमानेही मग त्याचप्रमाणे आली. लेहला कुमक मिळाली. उतरल्यावर ताबडतोब गुरखा कंपनीने आक्रमकांना थांबवण्यासाठी पश्चिमेकडे कूच केले. स्थानिक लोकांनी स्वयंचलित मोटर कार ह्यापूर्वी कधीही पाहिलेले नव्हते. मग विमान पाहणे तर सोडूनच द्या. त्यांनी तत्परतेने 'उडत्या घोड्यांकरता' चारा आणला!

जोझिला, द्रास आणि कारगील शत्रूच्या हाती गेले होते. खुष्कीचा केवळ एकच मार्ग आता आपल्याला उपलब्ध होता. तो म्हणजे हिमाचल प्रदेशच्या रोहतांग खिंडीवाटे मनालीपर्यंतचा. हे अंतर ४७५ किलोमीटरचे होते. मेजर हरिचंद ह्यांच्या नेतृत्वाखालील २/८ गुरखा रायफल्स कंपनीस २८ मे १९४८ रोजी पंजाब मधिल फिरोझपूरहून मनालीपर्यंत हलवण्यात आले. १५१ सैनिक, ६०० रायफल्स आणि दारुगोळा ह्यांसह ती कंपनी सर्व उपलब्ध हमाल आणि घोडे ह्यांना घेऊन निघाली. १७,००० फूट उंच चढून; बारालचा, लाचुलुंग आणि टँगलांग खिंडी पार करत, ५ जुलै १९४८ रोजी लेहला ९ दिवस चालुन पोहोचली.

कमांडिग अधिकारी लेफ्टनंट कर्नल एच.एस.परब ह्यांच्या नेतृत्वाखालील २/८ गुरखा रायफल्स कंपनी फिरोझपूरहून श्रीनगरला १७ ऑगस्ट रोजी हलवण्यात आली.

**<u>कर्नल परब लडाखचे लष्करी गव्हर्नर नियुक्त</u>**

वायूमार्गे नेण्यापूर्वी लेफ्टनंट कर्नल परब ह्यांना लडाखचे लष्करी गव्हर्नर नियुक्त करण्यात आले होते. जनरल थिमय्या ह्यांचा त्यांना हुकूम होता, “तुम्ही कोणत्याही किंमतीत लेहचे संरक्षण करा”.

आणखी कुमक (रि-एन्फोर्समेंटस) आणि रसद (सप्लाईज) त्यानंतर वायूमार्गे उतरवली गेली किंवा रोहतांग खिंडीमार्गे पायी पोहोचवण्यात आली. लेह वाचवण्यात आले. शत्रू नंतर मागे हटवला गेला. १ नोव्हेंबर १९४८ रोजी जोझिला ताब्यात आली आणि २३ नोव्हेंबर १९४८ रोजी कारगील. कर्नल परब ह्यांचे सैनिक लेहपासून पुढे सरकतच होते. जोझिलाकडून येणार्यांना ते २४ नोव्हेंबर १९४८ रोजी जाऊन मिळाले. १ जानेवारी १९४९ रोजी युद्धबंदी झाली.

**<u>ह्या धाडसी लोकांनी लडाख वाचवले</u>**

एअर कमोडोर मेहरसिंग ह्यांना महावीरचक्र प्रदान करण्यात आले. ऑगस्ट १९४८ मध्ये वायूदलातून त्यांनी राजीनामा दिला आणि नंतर ११ मार्च रोजी  विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला.

जनरल थिमय्या पुढे चीफ-ऑफ-आर्मी स्टाफ झाले.

लेफ्टनंट कर्नल शेर जंग थापा ह्यांना स्कार्डूचा बचाव केल्याखातर महावीर चक्र ,मेजर हरीचंद आणि कॅप्टन खुशालचंद ह्यांनाही, शौर्याकरता महावीर चक्र प्रदान करण्यात आले.

चेवांग रिंचेन ह्यांनाही महावीर चक्र प्रदान करण्यात आले.मात्र या सैनिकांच्या शौर्याला फारसे फ़ारसे महत्व देण्यात  आले नाही आणी नेहमी प्रमाणे ह्या सैनिकांची शौर्य गाथा काळाच्या पडद्यामागे दडुन गेली.

लेह विमान तळाच्या सीमेवर लढाईत जीव गमावलेल्या सैनिकांची स्मारके आहेत.देशाने या शुर सैनिकांचा सन्मान करण्याकरता तेथे युध्द स्मारक बांधणे जरुरी आहे.